आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ मे २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज मुंबईतल्या शिवाजी पार्क इथं सभा / इंडीय आघाडीच्या नेत्यांचीही बांद्रा कुर्ला संकुलात प्रचार सभा
- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा शेवटचा दिवस
- भारतीय नौदलाशी संबंधित हेरगिरी प्रकरणी एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेकडून काल आणखी एका व्यक्ती विरोधात आरोपपत्र दाखल

**आणि**

- नैऋत्य मौसमी पाऊस यंदा ३१ मे ला केरळमध्ये दाखल होण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजी पार्क इथं मुंबईतल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित प्रचार सभेला संबोधित करतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या सभेला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मुंबईत सहा लोकसभा मतदारसंघात येत्या सोमवारी मतदान होणार आहे. दरम्यान सकाळी १० ते मध्यरात्रीपर्यंत वाहतूक निर्बंध लागू केले आहेत, अशी माहिती मुंबई वाहतूक पोलिसांनी दिली आहे. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पाचव्या टप्प्यासाठी प्रचार शिगेला पोचला आहे.

<><><><><>

मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ग्राऊंडवर इंडीया आघाडीची रॅली आयोजित केली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि भारत आघाडीचे इतर नेते या रॅलीला संबोधित करतील.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज शेवटची तारीख आहे. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी पुढील महिन्याच्या १ तारखेला मतदान होणार आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील प्रत्येकी तेरा जागा, पश्चिम बंगालच्या नऊ जागा, बिहारच्या आठ जागा, ओडिशाच्या सहा जागा, हिमाचल प्रदेशच्या चार जागा, झारखंडच्या तीन जागा आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडच्या एका जागेसाठी सातव्या टप्प्यात मतदान होणार आहे. मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे.

**<><><><><>**

समाजवादी पक्षानं आता बंगालमध्ये आश्रय घेतला आहे आणि त्यांची राजकीय युती केवळ व्होट बँक आणि तुष्टीकरणासाठी आहे, असा आरोप प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज बाराबंकी इथं झालेल्या सभेत त्रृणमुल काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या युतीवर केला आहे. आज बाराबंकी इथल्या सभेत मोदी म्हणाले की, काँग्रेस आणि समाजवादी पक्ष सत्तेत आला तर ते अयोध्येतील राम मंदिरावर बुलडोझर चालवतील.

**<><><><><>**

भारतीय नौदलाशी संबंधित हेरगिरी प्रकरणी एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल आणखी एका व्यक्ती विरोधात आरोपपत्र दाखल केलं. यामध्ये पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचा सहभाग असल्याचा संशय आहे. या प्रकरणी अमन सलीम शेख हा मुख्य आरोपी असून, संरक्षण आस्थापनांशी संबंधित गोपनीय माहिती मिळवण्यासाठी पाकिस्तानी एजंटच्या मदतीनं भारतीय नौदल अधिकाऱ्यांना हनी ट्रॅप मध्ये अडकावल्याचा त्याच्यावर आरोप आहे. या प्रकरणी एनआयए नं ६ नोव्हेंबर २०२३ रोजी अन्य दोन आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केलं होतं.

**<><><><>**

नायगाव - जुईचंद्र असा नवा बायपास तयार करून बोरीवली, कोकण रेल्वे मार्गाला जोडण्याच्या कामाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार मंजुरी दिल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज कांदिवली इथं झालेल्या कोकणवासियांच्या मेळाव्यात दिली. हार्बर मार्ग बोरिवलीला जोडण्याच्या आणि वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरू करण्याच्या कामांनाही मंजुरी दिल्याचं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातले भाजपा आणि महायुतीचे उमेदवार पीयूष गोयल यांनी या मेळाव्यात रेल्वेमंत्र्यांकडे या तीन मागण्या केल्या होत्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निर्देशांनुसार या तीनही कामांना मंजुरी मिळाल्याचं वैष्णव यांनी जाहीर केलं.

**<><><><>**

त्रिनिदाद आणि टोबॅगोचे प्रधानमंत्री डॉ. किथ ख्रिस्टोफर राऊली आणि त्यांची पत्नी शेरॉन राऊली भारत भेटीवर आले असून, काल त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवनात सदिच्छा भेट घेतली.

त्रिनिदाद टोबॅगोनं भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून प्रेरणा घेतल्याचं राऊली यांनी सांगितलं.त्रिनिदाद आणि टोबॅगो इथल्या विद्यापीठांनी महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांशी सहकार्य प्रस्थापित करावं अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

घाटकोपरमधील जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेसारखी पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी रेल्वे प्रशासनाला त्यांच्या हद्दीतील नियमबाह्य आकाराचे जाहिरात फलक हटवण्याचे निर्देश महानगरपालिका प्रशासनानं दिले आहेत. रेल्वेच नाही तर मुंबईतील कोणत्याही शासकीय अथवा खासगी जागेत जाहिरात फलक लावण्यासाठी महानगरपालिका तसंच वाहतूक पोलिसांनी निश्चित केलेल्या मानकांचं पालन करणं बंधनकारक असल्याचं  महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण **'दक्षिण मुंबई'** लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

बिगरबँक आर्थिक संस्थांनी ठराविक पद्धतीवर  आधारित क्रेडिट प्रारुपावरच्या त्यांच्या अवलंबित्वाबाबत सावध राहावं, असा सल्ला भारतीय रिझर्व्ह बँकेनं या संस्थांना दिला. ही प्रारुपं ऐतिहासिक डेटा वापरतात आणि यामुळे बाजारपेठेतल्या बदलत्या परिस्थितीत चूक होऊ शकते, असं मत रिझर्व्ह बँकेचे उप

गर्व्हर्नर स्वामिनाथन जे. यांनी बिगरबँक आर्थिक संस्थांच्या एका परिषदेत मांडलं. या संस्थांनी आपली व्यवहार्यता टिकवून ठेवण्यासाठी व्यवसायाच्या प्रारुपांवर लक्ष द्यावं आणि जोखीम टाळण्यासाठी पोर्टफोलिओ वेळोवेळी तपासावा, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं काल मुंबईत निवडक नागरी सहकारी बँकांचे मुख्य अनुपालन अधिकारी, मुख्य जोखीम अधिकारी आणि अंतर्गत लेखापरीक्षण प्रमुखांची परिषद आयोजित केली होती. 'लवचिक आर्थिक प्रणाली- प्रभावीपणे हमी देणाऱ्या कार्यप्रणालीची भूमिका', या संकल्पनेवर आधारित असलेल्या या परिषदेमध्ये १२० पेक्षा जास्त नागरी सहकारी बँकांचे जवळजवळ ३०० प्रतिनिधी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

भारतीय तटरक्षक दलाच्या 'राणी दुर्गावती' या नौकेनं काल भारताच्या सागरी हद्दीमध्ये मासेमारी करणाऱ्या श्रीलंकेच्या पाच मच्छिमार नौका आणि त्यावरच्या १४ कर्मचाऱ्यांना  ताब्यात घेतलं. पाल्कच्या  सामुद्रधुनीजवळ गस्तीवर असताना, तटरक्षक दलाला तामिळनाडूच्या  किनारपट्टी जवळच्या समुद्रात या संशयास्पद नौका आढळून आल्या. भारतीय सागरी हद्द कायद्याचं उल्लंघन केल्या प्रकरणी, पुढल्या कायदेशीर कारवाईसाठी तटरक्षक दलानं  या नौका आणि त्यावरच्या कर्मचाऱ्यांना नागापट्टीनम इथल्या किनारपट्टी सुरक्षा दलाकडे सुपूर्द केलं.

**<><><><><>**

आज जागतिक दूरसंचार आणि माहिती संस्था दिन आहे. इंटरनेटसह माहिती आणि दूरसंचार क्षेत्रातल्या इतर तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे सामाजिक आणि आर्थिक

क्षेत्रात होऊ शकणाऱ्या बदलांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. देशातल्या ६ लाखांपेक्षा जास्त खेड्यांसह ९९ टक्के भागांत फोर जी नेटवर्क पोहोचलं आहे.

**<><><><>**

कझाकस्तानची राजधानी अस्ताना इथं सुरू असलेल्या एलोरदा चषक स्पर्धेत महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत विद्यमान विश्वविजेती निखत झरीनसह भारताच्या चार मुष्टियोद्ध्यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक 2024 साठी भारताची प्रथम मानांकीत महिला टेबल टेनीसपटू मनिका बत्रा आणि अनुभवी शरथ कमल हे सहा सदस्यीय भारतीय टेबल टेनिस संघाचं नेतृत्व करतील. भारतीय टेबल टेनिस महासंघाने काल संघाची घोषणा केली. मोनिका जागतिक क्रमवारीत मोनिका 24 व्या स्थानावर आहे. शरथ कमल जागतिक क्रमवारीत 40 व्या स्थानावर आहे. यांच्या व्यतिरिक्त मानव ठक्कर, हपमीत देसाई, श्रीजा अकुला, अर्चना कामथ यांचा या संघात समावेश आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स चा सामना लखनौ सुपर जायंट्स बरोबर मुंबईतल्या वानखेडे स्टेडिअमवर संध्याकाळी  साडेसात वाजता खेळला जाणार आहे.

**<><><><>**

नैऋत्य मौसमी पाऊस यंदा ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यंदा २८ मे ते ४ जून दरम्यान पाऊस दाखल होईल. दक्षिण

अंदमानमध्ये येत्या रविवारपर्यंत मान्सून येण्याची शक्यता हवामान खात्यानं यापूर्वीच वर्तवली आहे.

दरम्यान, येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

वायव्य भारतात आणि बिहार राज्यात पुढील चार दिवसांत उष्णतेची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि राजस्थानच्या पश्चिम भागात २० मे पर्यंत उष्णतेची लाट येण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर पंजाब राज्य सरकारनं शाळांना सुटी जाहीर केली आहे.

**//<><><><><>//**